# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन कक्ष)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**वाचावे -**
1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची अधिसूचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य5दि.14/03/2020
4. शासन अधिसूचना क्रमांक कोरोना 2020/प्र.क्र.97/आरोग्य 5 दि.21/05/2020.
5. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.रास्वयो-2020/प्र.क्र.80/आरोग्य 6दि.23/05/2020
6. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु/कार्या19अ/530/2020 दि.26/05/2020
7. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची शासन निर्णय क्र.कोरोना 2020/प्र.क्र.150/आरोग्य 3 अ दि.30/06/2020
8. या कार्यालयाकडील आदेश क्र.डीसी/कार्या 9 क/499/2020 दि.18/07/2020
9. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील पत्र क्र.कोरोना-2020/प्र.क्र.97/आरोग्य - 5 दि.07/08/2020
10. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपू/कार्या 19अ/890/2020 दिनांक 08/08/2020
11. या कार्यालयाकडील आदेश क्र. आव्यमपू/कार्या 19अ/957/2020 दिनांक 20/08/2020
12. दि. 21/08/2020 रोजीची व्ही. सी. व्दारा आढावा बैठक.

| क्र.आव्यमपु/कार्या 19अ/९६४/2020 | **आदेश** | अहमदनगर दिनांक२२/08/2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोवीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक 4 चे अधिसूचनेनुसार या कार्यालयाकडील संदर्भ क्र.6 चे आदेशान्वये जिल्हयातील कोवीड-19 बाधीत रुग्णांना वाजवी दरात उपचार मिळण्यासाठी खाजगी रुग्णालयांनी विविध उपचारांसाठी (कोवीड बाधीत व इतर रुग्ण) आकारावयाचे कमाल दर मर्यादा निश्चित करून देण्यात आलेली आहे. तसेच खाजगी रुग्णालयांनी खाटा उपलब्ध करून देणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भ क्र.5 अन्वये कोवीड-19 प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांना लागू करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक 10 अन्वये जिल्हयातील रुग्णालयांमध्ये कोवीड बाधीत रुग्णांकडून आकारण्यात येणारे शुल्क व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत करण्यात येणारे उपचार व योजनेचा लाभ इ.बाबतची तपासणी करणेकामी जिल्हयातील सर्व तालुक्यामध्ये अधिका-यांचे भरारी पथक स्थापन करणेत आलेले आहे व कार्यवाही करणेबबात निर्देश दिलेले आहेत. तसेच महानगरपालिका स्तरावर आयुक्त, महानगरपालिका अहमदनगर यांनी पथकाची नेमणूक केलेली आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.11 अन्वये जिल्हयातील रुग्णालयांमध्ये कोवीड बाधीत रुग्णांकडून उपचारापोटी आकारण्यात येणारे बीलाची रक्कम रुपये 1 लक्ष पेक्षा जास्त असल्यास सदर बीलाची प्रथमतः संदर्भ क्र.10 अन्वये नेमणूक करणेत आलेल्या भरारी पथकाव्दारे तपासणी करुन, तपासणी अंती निश्चित होणारी बीलाची रक्कम संबंधित रुग्णालयांस अदा करणेबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 12 अन्वये कोव्हीड बाधीत रुग्णांकडून रुग्णालयांनी आकारलेल्या बिलांची पथकांव्दारे केलेल्या तपासणी बाबतचा आढावा घेणेकामी आयोजित बैठकीत अहमदनगर महानगरपालिका हददीमध्ये रुग्णालयांच्या बिलांची अदयापही तपासणी झाली नसलेची बाब निदर्शनास आलेली आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिका हददीतील काही रुग्णालयांमध्ये कोरोना बाधीत रुग्णांकडून बीलापोटी शासनाने

निश्चित केलेल्या दर मर्यादेपेक्षा जास्त दर आकारल्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. त्यास्तव, अहमदनगर महानगरपालिका हददीतील रुग्णालयांव्दारा कोव्हीड बाधीत रुग्णांकडून आकारण्यात येणा-या बिलांची तपासणी करणेकामी पथकांची नेमणूक करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, अहमदनगर साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार **अहमदनगर महानगरपालिका हददीमधील रुग्णालयांकडून कोव्हीड बाधीत रुग्णांकडून उपचारापोटी आकारण्यात येणा-या बीलांची तपासणी करणेकामी व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत करण्यात येणारे उपचार व योजनेचा लाभ इ.बाबतची तपासणी करणेकामी खालील प्रमाणे समिती स्थापन करुन पथकांची नेमणूक करण्यात येत आहे.**

| **अ.क्र** | **अधिका-यांचे नाव व पदनाम** | **मोबाईल क्र.** | **समितीतील पद** |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती पल्लवी निर्मळ,<br>उपजिल्हाधिकारी पुनर्वसन, अहमदनगर | 9403547207 | अध्यक्ष |
| 2 | श्री. प्रविण मानकर,<br>मुख्यलेखाधिकारी महानगरपालिका अहमदनगर | 7977737149 | सदस्य |
| 3 | डॉ. अनिल बोरगे<br>आरोग्य अधिकारी, महानगरपालिका अहमदनगर | 9561004609 | सदस्य सचिव |

**कोरोना बाधीत रुग्णांना रुग्णालयांकडून देण्यात येणा-या बीलांची तपासणी करणेकामी नेमणूक करणेत आलेली पथके.**

| **नियंत्रण अधिकारी पथक क्र. 1 ते 3<br>श्री. चंद्रशेखर शितोळे, तहसिलदार निवडणूक मो.क्र. 9881304874** | | | |
|---|---|---|---|
| **पथक क्रमांक** | **रुग्णालयाचे नाव** | **बीले तपासणी करणारे ऑडीटर** | |
| | | **नाव व पदनाम** | **मोबाईल क्र.** |
| 1 | मॅक केअर हॉस्पीटल,<br>मेडीकेअर हॉस्पीटल<br>नोबल हॉस्पीटल<br>न्युक्लीयस हॉस्पीटल<br>आरोग्यम अग्रवाल हॉस्पीटल | 1) श्री. एन. टी खेतमाळीस, लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालय अहमदनगर<br>2) श्री. राहुल किसन गांगर्डे, सहाय्यक लेखाधिकारी समाजकल्याण, अहमदनगर<br>3) श्री. अभिजीत ऋषी, सहाय्यक लेखाधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, जि.प. | 9730203435<br>9423165490<br>9881627007 |
| 2 | साईदीप हॉस्पीटल<br>सुरभी हॉस्पीटल<br>सुविधा हॉस्पीटल<br>देशपांडे हॉस्पीटल<br>स्वास्थ हॉस्पीटल | 1) श्री. रमेश कासार, लेखाधिकारी जिल्हा परिषद वित्त विभाग, अहमदनगर<br>2) श्री. अतुल कुलकर्णी, सहाय्यक लेखाधिकारी, स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालय अहमदनगर<br>3) श्री. राघवेंद्र चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी, समाजकल्याण जि.प | 9421436731<br>9423786806<br>9422087730 |
| 3 | विघ्नहर्ता हॉस्पीटल<br>अहमदनगर कोव्हीड केअर सेंटर पटीयाला हाऊस<br>दिपक हॉस्पीटल<br>लाईफलाईन सुपर स्पेशॅलीटी हॉस्पीटल<br>श्रीदीप हॉस्पीटल | 1) श्री. आशिष कांबळे, लेखाधिकारी जलस्वराज्य जिल्हा परिषद अहमदनगर<br>2) श्री. एन.ओ.पाटील, सहाय्यक लेखाधिकारी, स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालय अहमदनगर<br>3) श्री. कुशाबा पिसे, सहाय्यक लेखाधिकारी, कोषागार कार्यालय, अहमदनगर | 7385519564<br>9421010379<br>8668689309 |

| नियंत्रण अधिकारी पथक क्र. 4 ते 6<br>श्री. महेश पवार, तहसिलदार पुनर्वसन मो.क्र. 8956799922 | | | |
|---|---|---|---|
| पथक क्रमांक | रुग्णालयाचे नाव | बीले तपासणी करणारे ऑडीटर | |
| | | नाव व पदनाम | मोबाईल क्र. |
| 4 | जाधव हॉस्पीटल<br>आंबिका नर्सिंग होम<br>गॅलेक्सी हॉस्पीटल<br>अनभुले हॉस्पीटल<br>सीटी केअर ट्रस्ट हॉस्पीटल | 1) श्री. श्रीकांत देवडीकर, अप्पर कोषागार अधिकारी, अहमदनगर<br>2) श्री. पृथ्वीराज राजपुत, सहाय्यक लेखाधिकारी, वेतन पथक, माध्यमीक, जि.प.<br>3) श्री. एकनाथ कुलकर्णी, उपलेखापाल, भूसंपादन समन्वय शाखा | 9421958797<br>9860911996<br>9404400681 |
| 5 | खालकर हॉस्पीटल<br>बालाजी पेडीयाट्रीक ॲण्ड डेंन्टल हॉस्पीटल<br>प्रणव हॉस्पीटल मल्टीस्पेशॅलीटी ॲण्ड आयसीयु सेंटर<br>झावरे पाटील हॉस्पीटल ॲण्ड नर्सिंग होम<br>क्रिस्टल हॉस्पीटल ॲण्ड सेंटर | 1) श्री.दि.शं.प्रधान, लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक शिक्षण विभाग अहमदनगर<br>2) श्री. चंद्रशेखर वांडेकर, सहाय्यक लेखाधिकारी, पं.स अहमदनगर<br>3) श्री. अशोक शिंदे, उपलेखापाल, पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अ.नगर | 9823127196<br>9834245375<br>8378931759<br>8999302788 |
| 6 | पाटील ॲक्सीडेंट हॉस्पीटल<br>फाटके पाटील हॉस्पीटल<br>ॲपेक्स मल्टीस्पेशॅलीटी हॉस्पीटल<br>सिध्दीविनायक हॉस्पीटल | 1) श्री. सुरेश घायमुक्ते, लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर<br>2) श्री. आनंद साठे, उपलेखापाल, पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अ.नगर<br>3) श्री. अतुल राहींज, कनिष्ठ लेखा परिक्षक, लोकल फंड, अहमदनगर | 9767190328<br>9004978592<br>9028133882 |

**नेमणूक करणेत आलेल्या पथकाने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

1. पथकाने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नेमूण दिलेल्या रुग्णालयांनी संदर्भ क्र.4 मध्ये नमूद अधिसूचना व अधिसूचित दर रुग्णालयाचे दर्शनी भागावर रुग्णांना व नातेवाईकांना दिसेल अशा ठिकाणी लावले आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी.
2. पथकाने खाजगी रुग्णालये कोरोना बाधीत रुग्णांकडून शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त बीले आकारण्यात येतात किंवा कसे याबाबत तपासणी करावी.
3. पथकाने खाजगी रुग्णालयांकडून कोरोना बाधीत रुग्णांना उपचारापोटी आकारण्यात येणा-या बीलाची रक्कम रु. 1 लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रथमतः सदर बीलाची तपासणी करुन तपासणीअंती निश्चित होणारी बीलाची रक्कम संबंधीत रुग्णालयास अदा करावयाच्या रकमेबाबत रुग्णालय प्रशासन व रुग्णास कळवावे.
4. खाजगी रुग्णालयाने रुग्णाकडून शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम आकारल्याचे पथकास आढळून आल्यास रुग्णालयाने आकारलेल्या अतिरिक्त रक्कमेबाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा.
5. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत सर्व खाजगी रुग्णालयांनी दाखल होणा-या रुग्णांना कॅशलेस सुविधा उपलब्ध करून देण्यात येते किंवा कसे याबाबत तपासणी करावी.

पथकाने नेमून दिलेल्या रुग्णालयांची तपासणी करून तपासणी अहवाल नियंत्रण अधिकारी यांचे मार्फत समितीकडेस सादर करावा. समितीने पथकाकडून प्राप्त अहवालानुसार शासन निर्णयामध्ये नमुद विहित दरापेक्षा जास्त देयकाची आकारणी करणा-या व महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ न देणा-या रुग्णालयांवर कारवाई करावी.

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनूसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

**(राहुल व्दिवेदी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

**प्रति,**

**सर्व संबंधीत**

**प्रतः-**
1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
3. आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी .
4. जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
5. जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रसिध्दीसाठी.
6. सर्व संबंधीत विभाग प्रमुख ---------------------------------------- यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी